आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

७ ऑक्टोबर २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जनतेचा विश्वास आणि  कोट्यवधी कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- रिझर्व बँकेनं केली रेपो दरात पाव टक्के वाढ/ चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहण्याचा अंदाज

- जगातल्या श्रीमंत आणि गरीब देशांनी त्यांच्यावरचं कर्ज कमी करण्यासाठी आणि वाढत्या असमानतेचा सामना करण्यासाठी अधिक वेगानं पावलं उचलावी असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचं आवाहन

आणि

- भारतीय महिला क्रिकेट संघाचं कर्णधारपद स्मृती मानधनाकडे

**<><><><><>**

जनतेचा विश्वास आणि कोट्यवधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज २५ वर्षे पूर्ण झाली. तेव्हापासून आधी राज्य सरकारचे आणि त्यानंतर केंद्रसरकारचे प्रमुख म्हणून ते गेली सलग २५ वर्षे कार्यरत आहेत. यानिमीत्तानं आज नवी दिल्ली इथं झालेल्या विकसित भारत संकल्प सभेला त्यांनी संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. सरकार प्रमुख म्हणून गेल्या २५ वर्षांत कमावलेला जनतेचा विश्वास आणि या काळात आलेला अनुभव हीच आपली मोठी संपत्ती असल्याचं त्यांनी सांगितलं.

**- - -होल्ड बाईट - MODI SEVASANKALP - -**

देश आणि १४० कोटी देशवासियांच्या कल्याणासाठी, अहोरात्र  संपूर्ण निष्ठेनं लोकांची सेवा करण्यासाठी आपल्याला अधिक बळ आणि ऊर्जा मिळावी, अशी प्रार्थना आज ईश्वराकडे केल्याचं त्यांनी सांगितलं. कधीकाळी धोरण लकव्यानं ग्रासलेला अशी आपल्या देशाची ओळख होती, मात्र आता भारत आपलं वाढतं सामर्थ्य आणि लवचिकतेसाठी ओळखला जात

असल्याचं ते म्हणाले. गेल्या १२ वर्षांत देशाची परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, आता भारत निर्यातीत नवे विक्रम रचत आहे, आज मेड इन इंडिया मोबाईल फोन्सनी जागतिक बाजारपेठ व्यापली आहे, कृषी क्षेत्रातही सर्वोच्च आणि शाश्वत वाढ झाली आहे असं ते म्हणाले. जेव्हा धोरणांमध्ये स्पष्टता असते, तेव्हाच असे बदल शक्य होतात असं त्यांनी सांगितलं. आता भारताच्या उभारणीसाठी मोठी ध्येय बाळगण्याची हीच योग्य वेळ आहे असं ते म्हणाले.

७ ऑक्टोबर २००१ ला आपण गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, त्यावेळी या टप्प्यापर्यंत पोहचू असा विचार केला नव्हता, मात्र जनतेच्या आशीर्वादानं आणि पाठिंब्यानंच हे शक्य झालं अशी भावना त्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी देशवासियांचे, भाजपा आणि लोकशाहीवर श्रद्धा असलेल्या सर्व राजकीय सहकाऱ्यांचे आभारही मानले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनीही सलग २५ वर्षांच्या राष्ट्रसेवेबद्दल प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनसेवेलाच आपल्या आयुष्याचं एकमेव उद्दिष्ट मानलं, त्यांनी राजकारणाकडे राष्ट्रसेवेचं माध्यम म्हणून पाहिलं अशा शब्दांत त्यांनी प्रधानमंत्र्यांचा गौरव केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला आज २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रावस सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाऊन घेणार आहोत सुरुवातीच्या काळात गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांनी राबवलेल्या जलसंवर्धनाच्या उपक्रमांविषयी..

**- - - व्हॉईस कास्ट - - - -**

*(गुजरातमधे पाणीटंचाईचा प्रश्न उग्र झाला होता. नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री म्हणून प्रथम या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. केवळ मर्यादित कालावधीतली पाणीटंचाई असा विचार न करता पाण्याच्या एकात्मिक व्यवस्थापनावर भर दिला. सुजलाम् सुफलाम् असा फ्लॅगशिप कार्यक्रम राबवण्यात आला. ३३२ किलोमीटर लांबीच्या कालव्यातून ५०८ गावांमधे*

*पाणीपुरवठा सुरु झाला. नर्मदा नदीचं पाणी सौराष्ट्रातल्या जलाशयांमधे वळवण्यात आलं. त्यामुळे सुमारे १० लाख एकर क्षेत्र सिंचनाखाली आलं. २०१९ पर्यंत गुजरातमधे १ लाख ८५ हजार बंधारे बांधून झाले होते. आणि २००२च्या तुलनेत भूजल पातळी जवळजवळ ५० टक्क्यांनी वाढली होती. गुजरातमधल्या या जलसंवर्धनाच्या उपाययोजना साऱ्या देशासाठी पथदर्शी ठरल्या आहेत.)*

गुजरात भाजपातर्फे आज राज्यव्यापी सेवाज्योत यात्रा काढण्यात आली.

**<><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेने आज रेपो दरात पाव टक्के वाढ केली असून तो साडेपाच टक्के झाला आहे. रिझर्व्ह बँकेची द्वैमासिक पतधोरण आढावा बैठक मुंबईत झाली, त्यानंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी वार्ताहरांना सांगितलं, जागतिक अनिश्चिततेच्या वातावरणात चलनफुगवट्यावर नियंत्रण आणण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. बँकेनं रेपो दरात यापूर्वी फेब्रुवारी २०२३मध्ये वाढ केली होती. ऑगस्ट महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यांवर पोहोचला; त्या आधी जुलै महिन्यात हा दर ४ पूर्णांक ४५ शतांश टक्के इतका होता.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीचा जीडीपी वाढीचा सुधारित अंदाजही आरबीआयने जाहीर केला आहे. हा दर ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी वाढून ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहिल्याचं मल्होत्रा म्हणाले. तर चालू आर्थिक वर्षात चलन फुगवट्याचा दर ५ टक्क्यांवरून वाढून ५ पूर्णांक २ दशांश टक्के राहील असा अंदाज आरबीआयने वर्तवला आहे.

**<><><><>**

जगातल्या श्रीमंत आणि गरीब अशा दोन्ही देशांनी त्यांच्यावरचं कर्ज कमी करण्यासाठी आणि वाढत्या असमानतेचा सामना करण्यासाठी अधिक वेगानं पावलं उचलावीत असं आवाहन आयएमएफ अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टालिना जॉर्जियेवा यांनी केलं आहे. पुढच्या आठवड्यात बँकॉक इथे होणाऱ्या आयएमएफ आणि जागतिक बँकांच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर त्या सिंगापूर इथं बोलत होत्या. या सर्व देशांच्या सरकारांकडे आर्थिक आव्हानांना सामोरं जाण्यासाठी आवश्यक साधनं आहेत,

त्यामुळे त्यांनी कोणताही विलंब न करता धोरणात्मक निर्णय घेण्याची गरजही क्रिस्टालिना यांनी व्यक्त केली.

<><><><>

फिजीमध्ये कॉप ३१ बैठकीपूर्वी आयोजित सत्रात भारतानं हवामानबदलाच्या संदर्भात ठोस पावलं उचलण्याचं तसंच पॅरिस कराराची जलद अंमलबजावणी करण्याचं आवाहन केलं. या सत्राला केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी संबोधित केलं. हवामानविषयक उद्दिष्टांच्या समजुतीमधल्या तफावती दूर करणं, याबाबतच्या सध्याच्या वचनबद्धता पूर्ण करणं, तसंच जागतिक तापमान वाढ दीड अंश सेल्सियसपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या उद्दिष्टपूर्तीला गती देण्याची गरज भूपेंद्र यादव यांनी व्यक्त केली.

यादव यांनी या कार्यक्रमादरम्यान संयुक्त राष्ट्रांच्या उपमहासचिव अमिना मुहम्मद आणि संयुक्त राष्ट्र हवामानबदल आराखडा कराराचे सचिव सायमन स्टील यांच्याशी हवामानविषयक वित्तपुरवठा, न्याय्य संक्रमण अशा विषयांवर चर्चा केली.

<><><><>

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरच्या कोपर्शी जंगल परिसरात माओवाद्यांनी जमिनीत पुरून ठेवलेली सहा शस्त्रं आणि स्फोटकं गडचिरोली पोलिसांनी जप्त केलं आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथक आणि बीडीडीएस पथकानं ही कारवाई केली. यात २१ जिवंत काडतुसे, सात डिटोनेटर आणि १५० मीटर केबल वायर जप्त करण्यात आली. याशिवाय वॉकीटॉकी संच, मॅगझिन, कुकर आणि इतर माओवादी साहित्यही आढळलं. यातलं काही साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आलं.

<><><><>

आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीनं कापसाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी ७ ऑक्टोबर हा जागतिक कापूस दिन म्हणून साजरा केला जातो. 'कॉटन फॉर गुड: व्यापार, परिवर्तन आणि भागीदारीतून समृद्धी' अशी या वर्षाची संकल्पना आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह यांनी एका व्हिडीओ संदेशातून या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. कापसाचं उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करणं हे या दिवसाचं महत्त्व

आहे. या शेतकऱ्यांमुळेच सूत गिरण्या, जिनिंग युनिट्स, कापड निर्मिती केंद्र किंवा तयार कपड्यांचे कारखाने अशा संपूर्ण साखळीतील कामगारांना रोजगार मिळतो, असंही ते म्हणाले.

<><><><><>

बेस्ट उपक्रमाचा २०२७-२८ या वर्षाचा अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला. यात पुढील वर्षी १३१७ कोटी रुपये तुटीचा अंदाज मांडण्यात आला आहे. पुढील वर्षात ९८७६ कोटी रुपये खर्चाचा अंदाज असून केवळ ८५५९ कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित आहे.

उपक्रमाच्या विद्युत विभागाच्या वितरण जाळ्यांचं सक्षमीकरण पुढील वर्षात केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे एकीकृत परिवहन सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. बेस्टचे मार्ग आणि वेळापत्रक याचे सुसूत्रीकरण करण्याची ग्वाही या अर्थसंकल्पात देण्यात आली आहे.

बेस्टच्या महाव्यवस्थापक पदाचा कार्यभार असलेल्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता वर्मा यांनी अर्थसंकल्प बेस्ट समितीत सादर केला.

<><><><><>

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी अनुभवी फलंदाज स्मृती मानधना हिची नियुक्ती झाली आहे. हरमनप्रीत कौरने काल कर्णधारपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतल्यानंतर ही नियुक्ती क्रिकेट नियामक मंडळाने केली. स्मृती मानधना २०१३ पासून भारतासाठी खेळत आहे, आणि तिने १८ टी ट्वेंटी सामन्यांमधे आणि एकदिवसाच्या ४ सामन्यांमधे कर्णधारपदाची धुरा सांभाळली आहे.

//<><><><><>//